REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# "कोल्हापूर जिल्हयाच्या विकासामध्ये शिवाजीराव खोराटे यांचे योगदान एक दृष्टीक्षेप"



प्रा. डॉ. पाडळकर व्ही.व्ही.
इतिहास विभाग प्रमुख, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव .

## सारांश (Abstract)

कोल्हापूर जिल्हयातील समाजवादी, पुरोगामी चळवळीचा आघाडीचा कार्यकर्ता म्हणून शिवाजीराव खोराटे यांची कोल्हापूर जिल्हयात ओळख आहे. खोराटे याचा कोल्हापूरजिल्हयाच्या सहकार, शैक्षणिक व राजकीय विकासामध्ये सहभाग महत्त्वाचा राहीला आहे. प्रजापरिषद चळवळी या नेतृत्वाचा उदय झाला. खोराटे यांनी आयुष्यभर वंचितासाठी मोर्चा, धरणे, आंदोलने, घेराव इ. मार्गाचा अवलंब करून जिल्हयामध्ये चळवळ उभारली. कोल्हापूर जिल्हयाच्या सहकार व शैक्षणिक क्षेत्राच्या विकासामध्ये त्याचा सहभाग महत्वाचा आहे. राजकारणापेक्षा समाजकारनाचे वृत्त त्यांनी अंगिकारले. काळम्मावाडी म्हणजे सध्याचे शाहू जलसागर धरण व्हावे यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. त्यामुळे त्यांना काळम्मावाडी धरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते.

## पूर्वपरिचय :

कोल्हापूर जिल्ह्यातील समाजवादी, पुरोगामी चळवळीतील एक आघाडीचा कार्यकर्ता म्हणून शिवाजीराव खोराटे यांची ओळख आहे. कोल्हापूर जिल्ह्यांच्या सहकार, शैक्षणिक व राजकीय विकासामध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांच्या जन्म ५ जानेवारी, १९१४ रोजी सरवडे येथे शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठोजी व मातेचे नाव ताईबाई होते. या दापत्यांना शिवाजीराव, रामचंद्र, लक्ष्मण व तुळशीबाई अशी चार अपत्ये होती. शिवाजीरावांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या जन्मगावी व तुरंबे येथे झाले. तर मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण न्यू हायस्कूल, कोल्हापूर येथे झाले. [१]

## प्रजापरिषद चळवळीतील योगदान

कोल्हापूर संस्थानात ६ फेब्रुवारी, १९३९ रोजी स्थापन झालेल्या कोल्हापूर प्रजापरिषदेचे शिवाजीराव प्रारंभापासून कार्यकर्ते होते. त्यांच्यावर महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण, साने गुरुजी, राम मनोहर लोहिया इत्यांदी नेत्यांचा प्रभाव होता. त्यामुळे ते प्रजापरिषदेचे सक्रीय कार्यकर्ते बनले. कोल्हापूर प्रजापरिषदेच्या मध्यवर्ती समितीच्या सहकार विभागाचे ते सल्लागार व संघटक होते. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी प्रजापरिषदेच्या माध्यमातून सहकार तत्त्वावर शेतकी पतसंस्था स्थापन केल्या. तसेच ते राधानगरी तालुका प्रजापरिषद संघटनेचे १९४४-४९ या काळात चिटणीस होते.[२] त्यांनी याकाळात शेतकऱ्यांचे संघटन घडवून आणणे व ग्रामपंचायतीची स्थापना करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले होते.

## गुळ परिषदा व आंदोलने :

१९५५ पूर्वी कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापूर शुगर मिल्स् हा एकमेव सहकारी साखर कारखाना होता. त्यामुळे तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांनी स्वत:ची गुऱ्हाळे उभी केली होती. या गुऱ्हाळात तयार होणाऱ्या गुळाला देशाच्या बाजारपेठेत फार मोठी मागणी होती. परंतु अडते व्यापारी शेतकऱ्यांची फसवणुक करीत होते. त्यामुळे गुळाला वाजवी किंमत मिळत नव्हती.

परिणामी शेतकरी अडचणीत सापडला होता. म्हणून शिवाजीरावांनी गुळाला योग्य दर मिळावा म्हणून जिल्ह्यात गुळ परिषदा भरवल्या. सन १९५२ मध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली सरवडे येथे गुळ परिषद झाली. या गुळ परिषदेचे अध्यक्ष क्रांतीसिंह नाना पाटील होते. त्यानंतर १३ डिसेंबर १९५३ मध्ये सांगरूळ येथे भरलेल्या गुळ परिषदेचे शिवाजीराव अध्यक्ष होते. [३]

## सहकार चळवळीतील योगदान

जिल्ह्याच्या सहकारी चळवळीमध्ये शिवाजीराव यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सहकारी साखर कारखाना, शेतकी पतसंस्था, शेतकरी सहकारी संघ, बाजार समित्या इ. संस्थांच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता.

## राधानगरी तालुका शेतकरी संघ :

शिवाजीरावांनी सुपरवायझिंग युनियनच्या सदस्याच्या सहकार्याने १९५५ मध्ये राधानगरी तालुका शेतकरी संघाची स्थापना केली. या संघाचे ते दीर्घकाळ अध्यक्ष होते. त्यांच्या काळात या संस्थेचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. सद्या या संस्थेच्या १८ शाखा कार्यरत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील तालुका स्तरावर पहिला बझार १९६३ मध्ये तारळे येथे स्थापन केला त्यानंतर सरवडे, राशिवडे खुर्द येथेही बझार सुरू करण्यात आले. सद्या सरवडे येथील बझार शिवाजीराव बझार या नावाने ओळखला जात आहे. शेतकरी संघामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना निकोप बियाणे, खते, तेल, कडधान्ये मिळण्याची सोय उपलब्ध झाली. हा संघ जिल्ह्यातील एक अग्रेसर संघ म्हणून ओळखला जातो. या संघाच्या प्रगतीवरून शिवाजीरावांच्या उत्कृष्ठ प्रशासनाची कल्पना येते.[४]

## दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री

या कारखान्याच्या स्थापनेत शिवाजीराव खोराटे अग्रभागी होते. या कारखान्याचा पहिला प्रस्ताव शिवाजीरावांच्या नेतृत्वाखाली तयार झाला होता. त्याचे ते चिफप्रमोटर मूळप्रवर्तक) होते. परंतु ते समाजावादी पक्षाचे कार्यकर्ते असल्याने सत्ताधारी पक्षाकडून अडथळा येण्याची चिन्हे दिसताच त्यांनी काँग्रेसच्या व्ही.टी. पाटील यांना कारखान्याचे चिफप्रमोटर केले. या कारखान्याच्या भागभांडवलासाठी त्यांनी संपूर्ण दूधगंगा खोरे पिंजून काढले. त्यास शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. शेवटी सन १९५६ मध्ये या कारखान्यास मान्यता मिळली. खोराटे हे या कारखान्याचे संस्थापक सदस्य होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत लोकाभिमुख कारभार केला. या कारखान्यात दलितांना आरक्षण असावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. [५]

## भू-विकास बँक :

शेतीच्या व शेतकऱ्यांच्या विकासासाठी शिवाजीरावांनी सन १९६० मध्ये भू-विकास बँकेची स्थापना केली या बँकेचे ते संस्थापक सदस्य होते.[६]

## पाणी पुरवठा संस्था :

उपसा सिंचन पद्धतीमध्ये पाणीपुरवठा संस्थाना महत्त्वाचे स्थान आहे. पाणी मुबलक असूनही पाणी उपसण्याचे साधन नसल्यामुळे येथील शेतकरी अडचणीत सापडला होता. म्हणून शिवाजीरावांनी शेतकऱ्यांच्या सहाय्याने सहकार तत्त्वावर कासारवाडा, कासारपुतळे, नरतवडे व कपिलेश्वर या ठिकाणी पाणी पुरवठा संस्था स्थापन केल्या. या पाणीपुरवठा संस्थामुळे शेती बरोबरच पिण्याच्या पाण्याची सोयही उपलब्ध झाली. [७]

## संयुक्त महाराष्ट्र चळवळ :

संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण झाले पाहिजे यासाठी मराठी जनतेने फार मोठे आंदोलन केले. या चळवळीत शिवाजीराव अग्रभागी होते. ते कोल्हापूर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या मध्यवर्ती शाखेचे निमंत्रक व राधानगरी तालुका संयुक्त समितीच्या

शाखेचे चिटणीस होते. त्यांनी प्र. के. अत्रे, एस. एम. जोशी, क्रांतीसिंह नाना पाटील इ. नेत्यांच्या तालुक्यात सभा, बैठका आयोजित केल्या. या सभेनां तालुक्यातील जनतेचा मोठा प्रमाणात प्रतिसाद मिळाला. खोराटेंनीं केलेल्या संघटनामुळे तालुका चळवळमय बनला. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षण घेतलेल्या ८७ स्त्री-पुरुषांनी ९ तुकडीच्या माध्यमातून सत्याग्रह केला होता. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली२१ मे, १९५६ रोजी दत्तू धोंडी पाटील, बळवंत संतराम पाटील, ज्ञानदेव मोरे इ. ११ कार्यकर्त्यांनी राधानगरी तहसील येथे सत्याग्रह केला. यावेळी त्यांना तुरूंगवास भोगावा लागला होता.[८]

## काळम्मावाडी धरण प्रकल्प चळवळ :

दूधगंगा नदीकाठावरील शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी या नदीवर धरण प्रकल्प होणे गरजेचे आहे. यासाठी शिवाजीरावांनी प्रथम दुधगंगा काठच्या शेतकऱ्यांचे संघटन केले. तसेच अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे व पाणी परिषदेद्वारे चळवळ अधिक गतिमान केली. सन १९६४ मध्ये शिवाजीरावांच्या नेतृत्वाखाली 'काळम्मावाडी धरण कृती समिती'ची स्थापना झाली. या कृती समितीचे शिवाजीराव १९७० पर्यंत अध्यक्ष होते.[९] या काळात राज्य व देश पातळीवरील अनेक नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी धरणपरिषदा भरवल्या. काळम्मावाडी प्रकल्पाच्या जनजागृतीसाठी त्यांच्या नेतृत्वाखाली सन १९५८ मध्ये काळम्मावाडी ते सिद्धनेर्ली पर्यंत 'लाँग मार्च' काढण्यात आला.[१०] त्यामुळे या चळवळीचे लोण तालुक्यापूरते मर्यादित न राहता संपूर्ण जिल्ह्यात पसरले होते. या प्रकल्प चळवळीचे नेतृत्व सत्ताधारी पक्षाच्या व्यक्तींकडे दिल्यास या प्रकल्पातील राजकीय अडथळा दूर होवून, चळवळीस गती यावी म्हणून त्यांनी १९७० मध्ये कृती समिती पुर्नरचना करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पुर्नरचित कृती समितीचे नेतृत्व दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षांकडे कायमस्वरूपी देण्यात आले. या पूर्नरचित कृती समितीचे ते सदस्य होते. [११]

काळम्मावाडी धरण प्रकल्प १४ टी.एम.सी.चा की, ३६ टी.एम.सी.चा याबाबत जिल्ह्यात मोठा वाद निर्माण झाला होता. त्यावेळी तालुक्यातील नेते, कार्यकर्ते यांचासह शिवाजीरावांनी १४ टी.एम.सी.च्या दादांच्या (वसंतदादा पाटील) योजनेला पाठिंबा दिला होता. मात्र हा प्रकल्प कालव्यासह पूर्ण झाला पाहिजे, यासाठी शिवाजीराव अग्रही होते. परंतु जिल्ह्यातील नेत्यांचा व जनतेचा ३६ टी.एम.सी. प्रकल्पाला पाठिंबा असल्यामुळे शिवाजीरावांनी वरील योजनेला उघडपणे पाठिंबा दिला नव्हता. [१२]

## धरणग्रस्तांच्या व इतर चळवळीतील योगदान :

शिवाजीराव धरणगस्तांचे पुनर्वसन झाले पाहिजे यासाठी प्रयत्नशील होते. राधानगरी धरणामुळे विस्थापित झालेल्या धरणग्रस्तांना संघटीत करण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली शंकर धोंडी पाटील, बापूसाहेब पाटील, गणी कलोट इ. कार्यकर्ते करत होते. तसेच दूधगंगा व भोगावती नदीकाठावरील वाढीव पाणीपट्टी व परवानगी नसताना पाणी उपसणाऱ्या शेतकऱ्यांवर झालेला दंड माफ करावा, यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली १४ जानेवारी, १९६३ रोजी राधानगरी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.[१३]तसेच हा प्रश्न सुटावा म्हणून शिवाजीराव अग्रभागी होते.

## शैक्षणिक कार्य :

कोल्हापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक चळवळीमध्ये शिवाजीरावांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता. गारगोटी येथे १९५० मध्ये 'जीवन शिक्षण प्रसारक मंडळा'ची स्थापना झाली. या शिक्षण संस्थेच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. या जीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे ते संस्थापक चिटणीस होते.[१४]

## मौनी विद्यापीठ :

जीवन शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने गारगोटी येथे मौनी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. या विद्यापीठाचे शिवाजीराव उपाध्यक्ष होते. हे विद्यापीठ ग्रामीण विद्यापीठ म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. [१५]

## मौनी विद्यापीठाचे वसतिगृह :

गारगोटी येथे स्थापन झालेल्या मौनी विद्यापीठांमुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. परंतु विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय झाली पहिजे, यासाठी व्ही. टी. पाटील, शिवाजीराव खोराटे, डी. वाय. पाटील, कोरगांवकर इ. कार्यकर्त्यांनी गारगोटी येथे वसतीगृह सुरू केले. या वसतिगृहाचे शिवाजीराव व पांडुरंग पाटील आश्रयदाते होते. ते राधानगरी तालुक्यातून धान्य गोळा करून या वसतिगृहास पुरवत होते.[१६]

## सरवडे शिक्षण प्रसारक मंडळ :

सरवडे येथे स्थापन झालेल्या सरवडे शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. या संस्थेच्यावतीने १९५६ मध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल सरवडे' या माध्यमिक विद्यालयाची स्थापना करण्यात आली. पूढे हे विद्यालय शिवाजीरावांनी चालवण्यास घेतले. ते या विद्यालयाचे दीर्घकाळ अध्यक्ष होते. सद्या या विद्यालयात आर्टस् व सायन्स ज्युनिअर विभाग सुरू आहेत. या विद्यालयाचे त्यांच्या मृत्यूनंतर सन १९७९ मध्ये शिवाजीराव खोराटे विद्यालय असे नामकरण करण्यात आले.[१७]

## शैक्षणिक व्यासपीठाची स्थापना :

राधानगरी, भुदरगड व कागल या तालुक्यातील शैक्षणिक संस्थाचा विकास व्हावा शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिवाजीरावांच्या नेतृत्वाखाली बिद्री येथे शैक्षणिक व्यासपीठ स्थापन करण्यात आले होते. परंतु त्यांच्या अकाली मृत्यूमुळे ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली नाही. या शैक्षणिक व्यासपीठाचे ते चिटणीस होते.[१८]

## राजकीय क्षेत्रातील योगदान :

शिवाजीराव न्यू हायस्कूल कोल्हापूर येथे शिक्षण घेत असतानाच त्यांच्यावर जयप्रकाश नारायण, स.म.लोहिया, एस. एम. जोशी इ. नेत्यांचा प्रभाव पडला होता. त्यामुळे त्यांनी प्रजापरिषद चळवळीत उडी घेतली. प्रजापरिषदेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांचे संघटन केले. तसेच सहकारी संस्था स्थापन केल्या. त्यामुळेच कोल्हापूर प्रजापरिषदेने त्यांची सहकार विभागाचे सल्लागार व संघटक म्हणून निवड केली.[५३] ते सरवडे गावचे १९४६ ते ५१ या काळात सरपंच होते.[१९]

पुढे खोराटेंनी स्वातंत्र्योत्तर काळात २९ मे १९५० मध्ये समाजवादी पक्षात प्रवेश केला.[२०] लवकरच ते या पक्षाचे जिल्ह्यातील प्रमुख नेते बनले. ते या पक्षाचे १९५४ ते ६५ या काळात चिटणीस होते. त्यांनी १९५७ ची विधानसभेची निवडणूक लढवली. पण या निवडणुकीत त्यांना निसटता पराभव स्वीकारावा लागला. निवडणुकीतील पराभवाने नाउमेद न होता. ते कार्यरत राहिले. त्यामुळे १९६४ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत जनतेने त्यांना निवडून दिले.[२१] बिद्री सहकारी साखर कारखान्याचे खोराटे संस्थापक सदस्य होते. सन १९६४ च्या निवडणुकीत त्यांचा पॅनेलचा प्रचंड विजय झाला होता.[२२]

## आंदोलने व इतर कार्ये :

शिवाजीराव हे विरोधी पक्षाचे नेते होते. त्यांनी तालुक्याच्या विकासासाठी चळवळ उभी केली. महागाई, बेकारी, धरणग्रस्त, डंगे धनगर, अस्पृश्य इत्यादीसाठी जनआंदोलने केली. त्यांच्या या जन आंदोलनातून शंकर धोंडी पाटील, अरुण सोनाळकर, श्रीपतराव शिंदे इ. कार्यकर्ते निर्माण झाले.

खोराटे हे दलितांचे पुढारी होते. त्यांनी त्यांच्या विकासासाठी मागारवर्गीयांना सहकारी साखर कारखान्यात आरक्षण द्यावे, यासाठी समाजवादी पक्षामार्फत प्रयत्न केले. तसेच सरवडे येथे कोल्हापूर जिल्ह्यातील पहिली बौद्ध विहार स्थापून त्यास अर्थसहाय्य केले.[२३]बाबा आमटेंच्या सोबत त्यांनी एक गाव पाणवठा मोहिमेसाठी संपूर्ण तालुक्याचा दौरा केला. औद्योगिक प्रगतीसाठी खोराटे प्रयत्नशील होते. ते कोल्हापूर मयुर को -ऑप . इंजि. वर्क्स्‌चे संस्थापक सदस्य होते.[२४]

एकंदरीत शिवाजीराव खोराटे यांचे नेतृत्व स्वातंत्र्य चळवळ, संस्थान विलिनिकरण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व सहकार चळवळीतून तयार झाले होते. अशा कर्तृत्ववान नेत्याचा ४ ऑक्टोबर, १९७७ रोजी मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या

स्मृतिनिमित्त राधानगरी तालुका शेतकरी संघाच्या वतीने उत्कृष्ठ कृषी उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांस 'शेतीनिष्ठ पुरस्कार' दिला जातो. [२५]


१. मुलाखत विठ्ठलराव शिवाजीरावखोराटे वय ७०. दि.११.०२.२००८ वेळ स. ९ वा.
२. अखंड भारत १२ डिसेंबर १९४६ अंक ४८ वापृष्ठ २.
३. मुलाखतपाटील बळवंतसंतराम वय ८५ (मा.व्हा.चेअरमन बिद्रीसहकारीसाखरकारखाना) १३ मे २००९. सकाळी ११.०० वा.
४. मुलाखतएकशिंगेपांडुरंग (सेक्रेटरी, राधानगरीतालुकाशेतकरीसंघसरवडे) दि.०४.०३.२००८ सकाळी १२.०० वा.
५. जाधवजयसिंग, शिवकमल स्मरणिका शिक्षणप्रसारक मंडळसरवडे, संचलितसुवर्ण महोत्सवीवर्ष - २००६-२००७. पृष्ठ ७४-७५.
६. दै.पुढारी, १४ ऑक्टोंबर, १९६०.
७. मुलाखतपाटील बळवंतसंतराम वय ८५ (मा.व्हा.चेअरमन, बिद्रीसहकारीसाखरकारखाना) १३ मे, २००९, सकाळी ११.०० वा.
८. दै.सत्यवादी, २२ मे, १९५६. पृष्ठ ३.
९. काळम्मावाडी कृति समितीदूधगंगावेदगंगासहकारीसाखरकारखाना बिद्री. प्रोसेडिंग फाईल
१०. दै.पुढारी, १ जून, १९५८. पृष्ठ १.
११. काळम्मावाडी कृति समितीदूधगंगावेदगंगासहकारीसाखरकारखाना बिद्री. प्रोसेडिंग फाईल,
१२. मुलाखत सि.धो.पाटील (राष्ट्रपतीपुरस्कार) वय ८०, दि.०१.०४.२००९, संध्याकाळी ७.०० वा.
१३. दै.पुढारी, १६ जानेवारी १९६३. पृष्ठ ३.
१४. मुलाखतपाटील बळवंतसंतराम वय ८५ (मा.व्हा.चेअरमन बिद्रीसहकारीसाखरकारखाना) १३ मे २००९. सकाळी ११.०० वा.
१५. मौनी विद्यापीठगारगोटी कार्यालयीनकागदपत्रे.
१६. मुलाखतकुरळेशामराव बजरंग वय ६८, दि. १०.०८.२००९ सकाळी ९.०० वा.
१७. जाधवजयसिंग शिवकमल स्मरणिका शिक्षणप्रसारक मंडळसरवडे संचलितसुवर्ण महोत्सवीवर्षे २००६-०७ पृष्ठ ७४-७५.
१८. मुलाखतनामदेवरावशंकरराव भोईटे (सर) माजीआमदार, दि.०४ मे, २००८, सकाळी १२.०० वा.
१९. अखंड भारत, १३ जून १९४६, वर्ष ३ रे, अंक २३ वा. पृष्ठ ८. १२ डिसेंबर १९४६, वर्ष ३ रे, अंक ४८ वा. पृष्ठ ४.
२०. दै.पुढारी, दि.३०.०९.१९५०. पृष्ठ ३.
२१. दै.पुढारी, ९ मार्च, १९५७, अंक ५७, वर्ष १९ वे.
२२. दै.पुढारी, ५ जून, १९६२, पृष्ठ १-३.
२३. मुलाखत बळवंतसंतराम पाटील वय ८५ (मा.व्हा.बिद्रीसहकारीसाखरकारखाना) १३ मे २००९ वेळ ११.०० वा.
२४. कित्ता.
२५. दै.पुढारी, २ मार्च, १९५७, अंक ५२, वर्ष १९ वे. पृष्ठ ३.